


# लोकदूत

♦ संस्थापक संपादक – स्व. शरद आकोलकर




♦ वर्ष ४० वे ♦ यवतमाळ ♦email - lokdoot@rediffmail.com ♦ अंक क्र. ५९ ♦ सोमवार दि. १४ जून २०२१ ♦ किंमत ३.०० ♦ पृष्ठे ४

# स्वरा फॉर्म वरील जुगार अड्ड्यावर धाड

**यवतमाळ दि. १३ (का.प्र.)**

**शहराच्या बाहेर अगदी निर्जनस्थळी असलेल्या स्वरा फॉर्म नावाच्या अलीशान हॉटेल मध्ये दूर-दूर वरुन लोक जुगार खेळण्याकरीता येतात. रस्त्या पासुन दूर असल्याने याकडे कोणाचेही लक्ष जात नाही. त्यामुळे येथे रोजच जुगार अड्डा भरत होता. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जुगार सुरु असल्याची माहीती उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाला मिळाल्याने त्यांनी रात्री धाड टाकून १९ आरोपींना रंगेहाथ पकडले. हे सर्व आरोपी गर्भश्रीमंत असुन कारने आले होते. त्यांच्या कार , दुचाकी व मोबाईल सह सुमारे ८१ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

## १९ गजाआड : ८१ लाखाचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी टाकलेल्या धाडीत एका खोलीत शंकर नानाजी खैरे (२१) , निलेश बाबाराव झाडे (३४), राहुल संजय चित्तरवार (२०), निखिल अरविंद कुडमेथे (२०) सर्व रा. घुग्गुस , सुखदेव दत्तुजी दंदे (३७) रा. गिरीजा नगर यवतमाळ , शंकर हनुमंत अत्राम (३४) ,अमित यशवंत पाटील (३२) दोन्ही रा. राजुरा, नंदकुमार रामराव खापणे (२९) रा. कोलगांव ता. मारेगांव, दिपक शरद धात्रक (३६) रा. बस स्थानक चौक यवतमाळ , आकाश उर्फ शिवा पृथ्वीराज तिवारी (३१) रा. बाजोरीया नगर यवतमाळ ,रामेश्वर दत्ता व्यवहारे रा. रामकृष्ण नगर यवतमाळ पोलिसांनी या खोलीतून १८ लाख ७४ हजार ८९० रुपये जप्त केले तर दुसऱ्या खोलीत गब्बार मोते खान पठाण (४२) रा. रामनगर , आशिष शत्रुघ्न मडावी (३३) रा. बेवाडा चंद्रपुर , विनोद कवडू जिवतोडे (४०) रा. चिखलगांव ता. वणी , मोहम्मद अब्बास इस्राल अहमद सिद्दकि रा. इंदिरा नगर चंद्रपुर, आफिस खलिल रहेमान (५२) रा. गुरु नगर वणी , मोविन मुस्लीम शेख (३०) रा. घुग्गुस , जसदीश गुरुचरण पाटील (३७)रा. राजुर कॉलनी, सरफोद्दीन नन्ने शाह (५२) रा. राजुरा हे दुसऱ्या खोलीत बसुन जुगार खेळत होते. पोलिसांनी या खोलीतून १ लाख ३० हजार किंमतीचे मोबाईल व एकूण २० लाख ८९० रु. चा मुद्देमाल जप्त केला तर दुसऱ्या कारवाईत १९ लाख २३ हजार व चार चाकी वाहने किं. ६० लाख ७० हजार असा एकूण ८१ लाख २३ हजार रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सर्व आरोपींना शहर पोलिस स्टेशनला आणुन त्यांच्या विरोधात ४, ५, महाराष्ट्र जुगार कायदा कलम १८८ , २६९, २७० भादवि व साथरोग अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात येवून सर्व जुगाऱ्यांना रात्री पोलिस कोठडित डांबण्यात आले. सकाळी त्यांची जमानतीवर सुटका करण्यात आली. या ठिकाणी कित्येक दिवसा पासुन जुगार अड्डा भरतो परंतु काल पहील्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात जुगारी रंगेहाथ सापडले.

## वाईनबार मधुन दारु चोरणारे गजाआड




**वणी दि. १३ (रामकृष्ण वैद्य)**

वणीच्या देशमुखवाडीत अभिजीत अरुण सातोकर (३६) याचे विनर्स बार आहे. या बारमधून चोरट्यांनी दारु चोरल्याची तक्रार वणी पोलिस स्टेशनला देण्यात आली होती. त्यानुसार पोलिसांनी तपास सुरु केला असता त्यांना वणीच्या गोकुळ नगर येथे आरोपी रामेश्वर उर्फ रामा मनोकर साळुंके (३२) व राजु नारायण मोरे (३४) दोन्ही रा. गोकुळ नगर हे वाईनबार मधुन चोरी गेलेली दारु एका बंड्यावर ठेवुन ते दोघे तेथेच लपुन बसले आहे. अशी खबर मिळाल्यावरुन पोलिस घटनास्थळी पोहचले असता त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले. त्यांनी चोरुन आणलेला दारुचा

▶ पान ३ वर....

## जिल्ह्यात १२ पॉझेटिव्ह, ४७ कोरोनामुक्त

**यवतमाळ दि. १३ (का.प्र.)**



गत २४ तासात जिल्ह्यात कोरोनाबाधित रुग्णांपेक्षा बरे होणारे रुग्ण सहापट आहे. जिल्ह्यात १२ जण पॉझेटिव्ह तर ४७ जण कोरोनामुक्त झाले असून एकाही रुग्णाचा मृत्यू झालेला नाही. जि.प. आरोग्य विभागातर्फे प्राप्त अहवालानुसार रवीवारी एकूण १६४५ जणांचे रिपोर्ट प्राप्त झाले. यापैकी १२ जण नव्याने पॉझेटिव्ह आले तर १६३३ जणांचे रिपोर्ट निगेटिव्ह आले. सद्यस्थितीत जिल्ह्यात ४७१ रुग्ण ॲक्टीव्ह पॉझेटिव्ह असून यापैकी रुग्णालयात भरती १३० तर गृह विलगीकरणात ३४१ रुग्ण आहेत. तसेच आतापर्यंत एकूण पॉझेटिव्ह रुग्णांची संख्या ७२५५४ झाली आहे. सद्यस्थितीत जिल्ह्याचा पॉझिटीव्हीटी दर १०.९२ असून दैनंदिन पॉझिटीव्हीटी दर ०.७३ आहे तर मृत्युदर २.४६ आहे. पॉझेटिव्ह आलेल्या १२ जणांमध्ये १० पुरुष आणि २ महिला आहेत. यात दारव्हा येथील २, घाटंजी १, दिग्रस येथील १ , महागाव १ , पुसद २, राळेगाव १, वणी येथील १ , यवतमाळ येथील ३, तर झरीजामनी येथील एका रुग्णाचा समावेश आहे.

## कौटूंबिक कलहातून आत्महत्या

**राळेगाव दि. १३ (वार्ता.)**

राळेगांव तालुक्यातील आपटी रामपूर येथील हनुमान वासुदेव शहारे या इसमाने काल शनिवारी कौटूंबिक कलहातून विहीरीत उडी घेवुन आत्महत्या केली. राळेगांव पोलिसांनी मृत देह विहीरीतून काढून पंचनामा केला व उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविले. जा.फौ. १७४ अन्वये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

## १४ तोळे सोने देवूनही लग्नास नकार

**यवतमाळ दि. १३ (का.प्र.)**

हल्ली हुंडा बंदी कायदा असतांना देखिल पैशासाठी चटावलेले काही लोक या कायद्याचे उल्लंघन करुन मोठ्या प्रमाणात हुंडा मागतात. विवाहापुर्वी नागपुरच्या एका युवकाने यवतमाळात राहणाऱ्या दिप नगरातील उपवर मुली सोबत विवाह करण्यासाठी तिच्या पित्याला १४ तोळे सोने व लग्न नागपुर मध्ये करावे अशी मागणी केली. ही मागणी पुर्ण केली नाही तर लग्न मोडून टाकू म्हणून धमक्या दिल्या. या बाबत मिळालेल्या माहीती नुसार नागपुरच्या नंदनवन कॉलनी राहणारा सागर भाऊराव पिंपळकर (३२) व त्याचे इतर ५ नातलग हे यवतमाळला दिप नगरात राहणाऱ्या मुलीला पाहण्यासाठी आले होते. एकमेकांची पसंती झाल्यानंतर सागर सोबत आलेल्या त्याच्या ५ नातलगांनी १२ जुलै २०२० रोजी बैंठक घेतली. त्यात विवाह जुळला त्यानंतर १४ डिसेंबर २०२० रोजी त्यांनी १४ तोळे सोने व लग्न नागपुरच्या मंगलकार्यालयात थाटामाटात करावे अशी मागणी केली. व ही मागणी मान्य न केल्यास आम्ही लग्न मोडून टाकु म्हणून धमक्या दिल्या. नाइलाजास्तव सदर मुलीच्या वडीलांनी मागण्या मान्य करुन सुद्धा जुळविलेला विवाह मोडला. सदर तरुणीची फसवणूक केली. त्यामुळे तीने अवधूतवाडी पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरुन उपवर मुलगा व त्याचे ५ नातलग यांच्य विरोधात कलम ४१७ , ५०६, ३४ भादवि सहकलम ४ हुंडा प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

## जिल्ह्यात हवामान खात्याने केला येलो अलर्ट जाहीर

**यवतमाळ दि. १३ (का.प्र.)**

मुंबईत पावसाने उसंत घेतली तर जिल्ह्यातही आज दुपार पर्यंत ऊन पडले होते. परंतु शहर व परिसरात दुपारी पुन्हा पावसाच्या सरी आल्यात. हवामान खात्याने आज १४ जुन रोजी विदर्भात पावसाची शक्यता वर्तविली आहे. विजांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यात पुर्व विदर्भातील यवतमाळ सह अमरावती, अकोला, बुलढाणा , वाशिम या ५ जिल्ह्यात हवामान खात्याने येलो अलर्ट जारी केला. त्यामुळे या जिल्ह्यात तुरळक ठिकाणी मेघ गर्जनेसह पावसाची शक्यता आहे.

## वणीच्या पोस्ट ऑफिस मध्ये चोरीचा प्रयत्न

**यवतमाळ दि. १३ (का.प्र.)**

चोरट्यांनी आता पोस्ट ऑफिस सारख्या केंद्र शासनाच्या कार्यालयातही चोरीचा प्रयत्न केला. या बाबत मिळालेल्या माहीती नुसार वणीच्या पोस्ट ऑफिसच्या मुख्य कामकाजाच्या हॉलच्या खिडकीचा रॉड आरिच्या पत्त्याने कापला. व अज्ञात चोरट्याने कार्यालयात घुसून त्या ठिकाणी असलेली लाकडी अलमारी फोडून चोरीचा प्रयत्न केला. परंतु अलमारीत कॅश नसल्याने त्याला काही हाती लागले नाही. या बाबत नागोराव गोविंदा दुबे (५१) रा. टागोर चौक वणी यांनी वणी पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारी वरुन अज्ञात आरोपी विरुद्ध कलम ४५७, ३८०, ५११ भादवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

## माणिकवाडा येथील अवैध दारु विक्री करणाऱ्यांना तडीपार करा अन्यथा तहसील कार्यालयासमोर अर्धनग्न आंदोलनाचा इशारा

**नेर दि. १३ (वार्ता.)**

नेर तालुक्यातील माणिकवाडा व धनज येथील अवैध गावठी दारु व देशी दारुच्या विक्रीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे व भांडणात ही मोठी वाढ झाली आहे. येथील ग्रामपंचायतीने अवैधरित्या दारु विक्रेत्याला कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ देणार नाही असा ठराव ग्रामपंचायतीने घेतला आहे अशी परिस्थिती असतांना सुद्धा अवैध दारु विक्रीमध्ये कमी झाली नाही त्यामुळे दारु विक्रेत्यांना तडीपार करा अन्यथा तहसील कार्यालयासमोर अर्धनग्न आमरण उपोषण करु असा इशारा माणिकवाडा येथील गणेश वसंत केवटे यांनी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

नेर तालुक्यातील माणिकवाडा व धनज या दोन्ही गावात मोहफुला पासून गैरकायदेशीर रित्या गावठी दारु काढून खुलेआम विक्री होत आहे त्यामुळे गावात भांडण-तंटे वाढत आहे गावांमधील मोलमजुरी करणाऱ्या महिला या परिस्थितीला कंटाळून गेल्या आहेत तरुण मुलांचे भविष्य अंधारात जाण्याची भीती निर्माण झाली आहे यापूर्वी पोलीस स्टेशनला तक्रारी देऊनही गैरकायदेशीर दारु विक्रेत्यांवर नेर पोलीस स्टेशन नी कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे गावठी दारु विक्रेत्यांची हिंमत वाढली आहे. दारु विक्रेत्यांची नेर पोलिसांना वारंवार तक्रारी देऊनही पोलिसांनी कोणतीही दखल घेतली

▶ पान ३ वर....

## प्रभूदास राजा यांचे दुःखद निधन

**यवतमाळ दि. १३ (का.प्र.)**




यवतमाळ येथील विदर्भ हाऊसिंग सोसायटी , बाजोरीया नगर येथील प्रतिष्ठीत नागरीक प्रभुदास तुळसीदास राजा वय ८५ वर्षे यांचे आज दिर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचे मागे १ मुलगा दिपक राजा व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांचेवर आज मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

**आजचा अग्रलेख**

**मॉन्सूनची साथ अन् पेरणीची सुरुवात**



## अग्रलेख

# मॉन्सूनची साथ अन् पेरणीची सुरुवात

मॉन्सूनचा पाऊस जिल्ह्यात बरसू लागल्याने शेतकऱ्यांनी शेतात पेरणीचा धडाका आरंभला आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २४ हजार ४४० हेक्टरवर खरीपाची पेरणी झाली आहे. त्यात ५५३ हेक्टरवर सोयाबिनची पेरणी तर १९ हजार ९०० हेक्टरवर कापसाची लागवड झाली आहे. यात पुन्हा तीन हजार ९८७ हेक्टर क्षेत्रात तुरीची पेरणीही आटोपली आहे. थोडक्यात काय तर गेल्या आठ दिवसात पडलेल्या दमदार पावसाने शेतकऱ्यांनी पेरणीचा आरंभ करुन हे अभियान सध्या जिल्ह्यात धडाक्यात सुरु आहे. त्याकरीता जिल्ह्यात बियाण्यांची कमतरता नसली तरी त्याकरीता आवश्यक पैशाची व्यवस्था मात्र झालेली नाही. बहुतांश शेतकरी हे खरीप हंगामाच्या सुरुवातीला बँकांवर कर्जा करीता अवलंबून असतात. बँकानी अजूनही कर्ज वाटपा करीता हात सैल सोडलेला नाही. त्यामुळे बँकापुढची गर्दी तशीच आहे. शेतकरी कर्जा करीता रांगेत ताटकळत आहे. शेतकऱ्यांना कर्ज वाटपाच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने अधिक महत्व देत बँकावर त्याकरीता दबाव वाढवण्याची गरज आहे. अर्थात थोड्या फार अडीअडचणी सोडल्या तर हे ही काम होईलच व हा प्रश्न दरवर्षीचाच असल्याने त्यात नाविण्य नाहीच. त्यात थोडे कमी अधिक चालत असते. एवढेच.

मुळ मुद्दा असा की, जिल्ह्यात जरी पेरणीला सुरुवात झाली असली तरी कृषी विभागाने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करु नये असा इशारा दिला आहे. कृषी विभागाच्या मते सध्या जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडतो आहे. जोरदार पडणाऱ्या या पावसात पेरणी झाल्यास शेतातील गाळ वाहत जावून पेरणी दडपण्याची भिती आहे. शिवाय जमीनीत अजून पुरेशी ओल स्थिरावली नाही. त्यामुळे समजा पेरणी झाली अन् पावसाने उघाड दिली तर पेरणी उलटण्याची शक्यता आहे. म्हणून थोडी दमाने पेरणी करावी असा सल्ला कृषी विभाग देत आहे. असे असले तरी शेतातील पेरणी हा नेहमीच्या अनुभवाचा, मजूराच्या उपलब्धतेचा, बि–बियाणे तयार असण्याचा व सारी जुळवा जुळव झाल्यानंतरचा मुद्दा आहे. तसाच तो वैय्यक्तीक निर्णयाचा मुद्दा ही आहेच. शिवाय पाऊस पडण्या पूर्वी वा एक पाऊस पडल्या नंतर पेरणी करण्याची एक अत्यंत जुनी परंपराही कृषी क्षेत्रात आहेच. त्याला धुळ पेरणी या नावाने संबोधतात. पावसाची सुरुवात होण्या अगोदरच या पद्धतीने पेरणी केली जाते मग मृगाचा एकापाठोपाठ एक त्यावर पाऊस पडून पेरणी साधली जाते. अशी पिके लवकर उत्पादन देतात व ती जोमाने वाढतात असे समजण्याचाही एक प्रघात आहेच. या वहीवाटीतून अनेकांनी या वर्षी ही धुळपेरणी केली त्यातून यंदा मृग नक्षत्राचा मुहूर्त साधत पावसाला सुरुवात झाली. त्यापूर्वीही अनेक भागात तोक्ते वादळाच्या अनुषंगाने पावसाने आपली हजेरी लावली होती. त्यामुळे धुळपेरणी तशी ती म्हणता येणार नाहीच. यंदाची समाधानाची एक बाब म्हणजे मृगनक्षत्राचा मुहूर्त साधत पडलेला पाऊस हा सातत्याने पडतो आहे. पावसाळी वातावरणही कायम आहे. त्यामुळे यंदा बहुतांश पेरण्या साधतील असे गृहीत धरले तर ती बाब चुकीची ठरत नाही. शेती शास्त्रात म्हणा वा शेतीच्या पद्धतीत म्हणा पेरणी साधणे हा एक अत्यंत महत्वाचा सुरुवातीचा टप्पा आहे. पेरणी साधली की पुढचे सारे गणित आपसुकच जुळून येते व पेरणी उलटली तर सारे शेती तंत्र बिघडते. आपल्या भागात बहुतांश शेती ही पूर्णत: पावसावर अवलंबून असल्याने पाऊस आणि पेरणी याचे गणीत व्यवस्थीत साधायला हवे. यंदा ते चांगले जुळून येतांना दिसत आहे ही सर्वाधिक समाधानाची बाब आहे. मात्र दुसऱ्या आघाडीवर म्हणजे बियाण्यांच्या आघाडीवर थोडी कुरबूर आहे. आपल्याकडे सोयाबीन, तूर, कापूस ही विदर्भातील खरीप हंगामातील तीन प्रमुख पिकें आहेत. यात तुर आणि कापसाच्या बियाण्याबाबत बऱ्याच अंशी स्थिती समाधानकारक आहे. मात्र सोयाबीन बियाण्या बाबत अनेक ठिकाणी तुटवड्याची स्थिती आहे. मागच्या वर्षी अनेक शेतकऱ्यांनी पेरलेले बियाणे उगवलेच नाही. हजारो एकरात सोयाबीनच्या बियाण्या बाबत शेतकऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला होता. त्यामुळे यंदा कृषी केंद्र विक्रेत्यांना बियाणे आधि तुम्ही तपासा म्हणजे त्याची उगवण क्षमता तपासा व मगच ते विका असे बंधन घालण्यात आले आहे. पेरलेले बियाणे उगवले नाही तर त्या करीता कृषीकेंद्र चालकाला जबाबदार धरल्या जाणार आहे. ही अट बियाणे विक्रेत्या करीता जाचकच आहे. त्यामुळे ते विकतांनाच आमची जबाबदारी नाही घ्यायचे असेल तर घ्या नाही तर राहीले असे म्हणून हात वर करुनच कृषी केंद्र चालक विक्री करीत आहेत. त्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना त्या बाबत काहीशी साशंकता आहे.

तसेही शेती संबंधी अगदी हमी भावा पासुन ते बियाण्या पर्यंत आणि मजुरा पासून ते निसर्गाच्या साथी पर्यंत अनंत प्रश्न आहेतच. त्यामुळे त्याचा कितीही उहापोह केला तरी ते प्रश्न दरवर्षी व नेहमी प्रमाणे अनुत्तरीत राहतात.

## वडकी लसीकरण केंद्राला जि.प. सदस्या सौ. प्रीतीताई काकडे यांची भेट

# जिल्हा वार्तापत्र

## राळेगाव



प्रकाश मेहता



राळेगाव तालुक्यातील दि. १० जून रोजी वडकी येथे ग्रामपंचायत वआरोग्य विभागाच्या वतीने जि.प. शाळा येथे लसीकरन शिबिर घेण्यात आले. या शिबिराला गावातील ७१ जनानी उत्स्फुतपणे प्रतीसाद दिला.या शिबिराला वडकी गणाच्या जि.प. सदस्या सौ. प्रीतिताई काकडे यांनी भेट दिली व आपले लसीकरण करुन लसीकरणाबाबत जनजागृती केली.ह्यावेळेस आरोग्य सेविका एस.एम. मरकाम, आरोग्य सेवक विशाल सावरकर, बबन क्षीरसागर, तलाठी कोडापे, आशा सेविका माया येलके, भावना कापटे, वंदना गोबाडे उपस्थित होत्या.

# जागतिक रक्तदान दिन-विशेष लेख

मजसाठी एवढं करशील ना!

विश्वात्मक औदार्य हे नाव तस अतिसुंदर, अर्थही व्यापकच आहे. पण प्रत्येक मनामनात दातृत्वाची वृत्ती जागृत करणे, हे मात्र कठीण काम आहे.

दान कुठलंही असो ते सात्विक, सोज्वळ आणि अंतःकरणापासून असावं. आज ज्यांच्या जवळ अन्न, वस्त्र आणि निवारा नसणारेही अनेक कुटुंब आहे. अशांना सेवाभावी लोकांकडून नेहमीच मदत केली जाते. अन्नदान, वस्त्रदान, नेत्रदान अवयवदान याप्रमाणेच एक पवित्र दान म्हणजे रक्तदान.



आपण आपल्यातल्या मानवी मूल्यांना जागृत करुन सामाजिक बांधिलकी म्हणून स्वैच्छिक रक्तदान करीत असतो. आजही माणसाचा परमेश्वरावर प्रचंड विश्वास आहे. आपल्या धार्मिक संस्कृतीने म्हणा की आईने आपल्यावर केलेल्या संस्काराने म्हणा, पण आपण सामाजिक नितीमूल्याची जाणीव ठेऊनच वागतो. सर्वांच्या वर्तनात साम्य जरी नसेल तरी साधेपणा आणि विवेकबुद्धी नक्कीच आहे. एकमेकांचा आपण किती आदर करतो. इतरांशी कसे वागतो, यावरच मानवी मूल्याचे मापन होत असते. मानवी मूल्याची जपणूक होण्यासाठी रक्तदान दिनासारखे दिवस साजरे करणे गरजेचे आहे.

१४ जून हा जागतिक रक्तदान दिवस म्हणून संपूर्ण जगात साजरा होत असतो. यादिवशी रक्तदाते स्वैच्छिक रक्तदान करुन मानवता जपत असतात. मदत करणे हा प्रत्येक मानवाचा गुणधर्म आहे. प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या वेळी कुणाला तरी मदत करीत असतात. रक्तदान हेच श्रेष्ठदान........या वृत्तीने अनेक जण रक्तदान करीत असतात. काहीजण रक्तापलीकडे जाऊन रक्ताची नाती जपतात आणि मानवतेच मोठं वलय निर्माण होते. याच वलयातून माणूस एकमेकांना जोडला जातो, आणि सामूहिक प्रगती सुरु होते. जीवनाच्या सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही बाजूने विचार करण्याची क्षमता येते. एकंदरीत जगणे सुंदर होते. मानवता जीवन जगण्याचा मार्ग दाखवते. मानवता जोपासण्याचा आणि आचरणात आणण्याचा एक सोपा मार्ग म्हणजे रक्तदान आहे.

जे निरोगी, तंदुरुस्त आहे, कुणासाठी काहीतरी करुच अशी भावना मनात आहे त्यांनी जरुर रक्तदानाचा निर्णय घ्या. आवड म्हणून व छंद म्हणून नाही तर गरजवंतांना मदतीचा एक हात म्हणून शक्य असलेल्यांनी रक्तदान करा. थँलिसीमिया, सिकलसेल ग्रस्त मुलांना नेहमीच रक्ताची गरज असते. रक्त या विषयाला घेऊन अश्या मुलांच्या घरचे घाबरलेले असतात. दुःखामुळे त्या पालकांच्या जीवनातलं समाधान लोप पावलेल असत. आपण आपलं रक्तदान करुन त्यांच्या प्रश्नावरचा उपाय होऊ शकतो. त्या मुळे उदासीनतेच्या गर्तेत जगणाऱ्या तरुणांच्या चेहऱ्यावर आपण कुणाच्या कामी आलो या जाणिवेने नक्कीच समाधान येईल.

रक्ताची गरज सर्वालाच असते. कुणाला रक्त पाहीजे असते. तर कुणाला दान द्यायचे असते. प्रत्येकांच्या शरीरात असलेल्या या रक्तामुळे आज कित्येकांना जिवनदान मिळाले आहे. रक्तदानातून नवजीवन मिळणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. पण जेव्हा कुण्या जवळील जिवाभावाच्या व्यक्तीला रक्ताची गरज भासते तेव्हाच त्यांना रक्ताची खरी किंमत कळते. मित्रा तुमच्यासाठी काहीपण म्हणनारे देखील अशा वेळी कामी पडत नाही. त्या वेळी दाखवलेली हिम्मत म्हणजे रक्तदान होय. ज्याला सर्वश्रेष्ठ दान असेही म्हणतात.

आपलं दुःख बाजूला ठेऊन दुसऱ्यासाठी केलेल्या कृतीतून मिळणार समाधान खूप महान असते, याला आपण समृद्ध जगणं म्हणू शकतो.

**दान करु रक्ताचे**
**बीज रुजवू समाधानाचे।।**

रक्तदान असो, नेत्रदान किंवा अवयवदान यामुळे रुग्णाची रोगावर यशस्वी मात होते आणि रुग्णाला आपल्या आयुष्यात चैतन्य भरण्यासाठी उभारी मिळते. त्यामुळे जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन मानवतेचा अखंड प्रवाह वाहतो.

**'दानाचा संकल्प करुया.....**
**जीव वाचवूया'......**

दानामधून दान देणारा आणि घेणार दोघेही संतुष्ट होते. ज्या देवांवर ते विश्वासा ठेवतात, त्यांचे स्मरण करुन नवीन आयुष्याला सुरुवात करतात. दातृत्वामुळे जन्मांतरीच्या लाभणाऱ्या समाधानाने माणसातच देव असल्याची साक्ष मिळते. म्हणून आपल्याजवळ असलेल्यातल थोडस दान करायलाच पाहिजे.

मजसाठी एवढं करशील ना! असे म्हणणारे थँलेसमिया, सिकलसेल रुग्ण सुखाने जगताना दिसेल.

✻ शब्दांकन: प्रफुल भोयर
(यवतमाळ)
मो.न. ७०५७५८६४६८

# शहरातील केरकचरा, नाले, गटारी साफ करा

## पर्यावरण संवर्धनावर विशेष लक्ष द्या




उमरखेड दि. १३ (वार्ता.)

पावसाळा सुरु झाल्याने रोगराईच्या दृष्टीने पुर्व नियोजन म्हणून शहारातील कचरा, शहरालगतच्या नाल्यामधील गाळ तसेच शहरालगतची सर्व गटारे साफ करावी. मागील वर्षी पावसाळ्यात फातेमा कॉलनी मध्ये पाणी शिरले होते. त्यावर उपाययोजना म्हणून जामा मस्जिद मागील नाला पावर हाऊस ते फातेमा कॉलनी ते लिंगायत मोक्षधाम पर्यंतचा नाला जेसीबीने साफ करावा. पर्यावरण संवर्धनावर विशेष लक्ष देत, शहरात प्रचंड प्रमाणात इतरत्र पसरलेल्या केरी बॅग ची पर्यावरणाच्या दृष्टीने त्याची विल्हेवाट करावी. अश्या आशयाचे निवेदन जमाअत ए इस्लामी हिंद, उमरखेड तर्फे मुख्याधिकारी यांना देण्यात आले.

संघटने तर्फे पर्यावरण दिनानिमित्त सुरु असलेल्या मानवतेची दोन मिशन - आत्मसंरक्षण व पर्यावरण रक्षण अभियाना अंतर्गत १०० झाडे लावण्याचा संकल्प आहे. त्यासाठी पालीके ने १०० झाडे व ५० ट्री गार्ड उपलब्ध करुन द्यावे यासाठी पण एक वेगळे निवेदन यावेळी देण्यात आले. निवेदन देतांना स्थानिक अध्यक्ष काझी जहीरोद्दीन, राहत अन्सारी, युथ विंगचे इंजी. सुहेल शेख, एसआयवोचे हाफीज नदीम, मो. नजीब आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# शब्दकोडे क्र. ५०५



### आडवे शब्द:-

१. ऐश्वर्य
३. उपवन, बाग
५. प्रकार, हीन
६. सरदार दरकदार
७. कावळा
९. विलाप, रुदन
११. विष
१२. दिसण्यात साव, पण खरोखर चार
१३. येऊन ठेपलेला
१४. तुप्त होईपर्यंत, पोट भरेपर्यंत
१६. फणसाची एक जात
१७. रडगाणे
१८. लहानसेर रत्न
२०. गाणे-बजावणे
२१. बरोबरी, तुलना
२२. तोंडी खरडपट्टी
२३. भिजवलेला व मळलेला पदार्थांचा गोळा

### उभे शब्द :-

१. शत्रू
२. अंमलदार
३. राहणे, वस्ती
४. चुलता
५. नटवेगिरीचा, मानमरातबाचा पोशाख
८. विपन्नावस्था, हळू हळू कमी होत जाणे
१०. तोपर्यंत
१२. प्रतिवर्षी
१५. संसार, जग
१९. अधिक जहाल
२०. अचेतन, वजनदार
२१. नेहमी, निरंतर

## दिन-विशेष

**सोमवार दि. १४ जून २०२१**
**वैशाख शु. ४, श्री. शालिवाहन शके १९४३,**
**सूर्योदय : ०५:५८ सूर्यास्त : १९:०६**
**नक्षत्र - पुष्य, चंद्र - कर्क**
**दिनविशेष :-**

चंद्र माह : ज्येष्ठ
पक्ष : शुक्ल पक्ष
तिथि : चतुर्थी - २२:३४ पर्यत
नक्षत्र : पुष्य - २०:३७ पर्यत
योग : धुव - ०९:२८ पर्यत
करण : वणिज - १०:१० पर्यत
द्वितीय करण : विष्टि - २२:३४ पर्यत
सूर्य राशि : वृषभ
चंद्र राशि : कर्क
राहुकाल : ०७:३७ ते ०९:१६
गुलिक काल : १४:१४ ते १५:५३
यमगण्ड : १०:५६ ते १२:३५
अभिजितमुहूर्त : १२:०८ ते १३:०१
दुर्मुहूर्त : १३:०१ ते १३:५४
दुर्मुहूर्त : १५:४० ते १६:३३
अमृत काल : १३:४७ ते १५:३०

### राशी - भविष्य

मेष :- जुनी दुखणी वाढण्याची शक्यता.
वृषभ :- व्यवसाय वृध्दी.
मिथून :- वाहन, यंत्रे जपून हाताळा.
कर्क :- गुंतवणुक फायद्याची राहील.
सिंह :- मनाजोगा व्यवसाय मिळेल.
कन्या :- इतरांच्या भानगडीत हस्तक्षेप नको.
तुळ :- थोड्या प्रयत्नातुन कार्यसिध्दी शक्य.
वृश्चिक :- शत्रु परास्त होतील.
धनु :- घाईगडबडीत काम बिघडण्याची शक्यता.
मकर :- वाणीवर नियंत्रण ठेवा.
कुंभ :- नेत्र विकार संभवतात.
मीन :- व्यवसाय नोकरीत लाभ.

### घटना :

१७०४: मुघलांच्या कैदेत असलेल्या संभाजीराजे यांच्या मुलाचे औरंगजेबाने लग्न लावून दिले.
१८९६: महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी अनाथ बालिकाश्रम ही संस्था स्थापन केली.
१९३८: सुपरमॅनची चित्रपट कथा पहिल्यांदा प्रकाशित.
१९४५: भारताला स्वायत्तता देण्यासंबंधीची वेव्हेल योजना जाहीर.
१९६७: चीनने पहिल्या हायड्रोजन बॉम्ब ची चाचणी केली.
२००१: ए. सी. किंवा डी. सी. यापैकी कोणत्याही विद्युतप्रवाहावर चालणाऱ्या उपनगरी गाडीचा शुभारंभ पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक वासुदेव गुप्ता यांच्या हस्ते झाले.

### मृत्यू :

२०१०: इंग्रजी लेखक मनोहर माळगावकर यांचे निधन. (जन्म: १२ जुलै, १९१३)

### जन्म :

१४४४: भारतीय खगोलशास्त्रज्ञ आणि गणितज्ञ निळकंथा सोमायाजी यांचा जन्म.
१९२२: हिंदी चित्रपट दिग्दर्शक, निर्माता आणि पटकथा लेखक के. आसिफ यांचा जन्म. (मृत्यू : ९ मार्च, १९७१)




हे वृत्तपत्र संपादक–प्रकाशक श्री. अजय शरदराव आकोलकर, मालक – अजय शरदराव आकोलकर, संजय शरदराव आकोलकर यांनी मुद्रक शैलेश दत्तात्रय सारवे यांचे शैलेश ॲडव्हरटाईझींग ॲन्ड प्रिन्टर्स धामणगाव रोड यवतमाळ येथे मुद्रित करून दैनिक लोकदूत कार्यालय, श्याम टॉकीज रोड, यवतमाळ येथे प्रकाशित केले. ■ रजि.नं. RNI/39953/1982 ■ पोस्ट सवलत क्र. Ytl/234/2015-17 ■ मो.नं. ९८२२५७१२१३, ९८५०८७५१२३■ ई–मेल lokdoot@rediffmail.com ■कार्यालयाचा पत्ता – दैनिक लोकदूत, श्याम टॉकीज रोड, यवतमाळ. – वृत्तपत्रातील मजकुराबाबत सर्व दावे हरकती यवतामळ न्यायालया अंतर्गत.

पान १ वरुन.....

## माणिकवाडा येथील अवैध दारु विक्री.....

नाही त्यामुळे तक्रारकर्ते यांना अवैधरित्या दारु विक्रेत्यांकडुन जीवे मारण्याच्या धमक्या देतात त्यामुळे या आठ दिवसांमध्ये गैरकायदेशीर दारू विक्रेत्यांना जिल्हाबाह्य तडीपार करावे अन्यथा नेर येथील तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करु असा इशारा जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात गणेश केवटे उर्फ येडा समाज सेवक यांनी दिला. परंतु माझ्या जीवाचे बरे वाईट झाल्यास त्यांला नेर पोलीस स्टेशनचे वरीष्ठ अधिकारी व जिल्हाधिकारी तर माणिकवाडा येथील बिट जमादार राहील असा इशारा या निवेदनात दिला आहे.

## पिंपळगावच्या अपार्टमेंट मधून मोटर सायकल चोरली

यवतमाळ दि. १३ (का.प्र.) पिंपळगांव भागात असलेल्या अर्पना अपार्टमेंट येथे राहणारा अक्षय अशोक नवले (३४) याची एम.एच. २९ ए.डब्ल्यु. २९५७ क्रमांकाची मोटर सायकल अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. २५ हजार रुपये किंमतीची ही मोटर सायकल चोरी प्रकरणी त्याने शहर पोलिस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला.

# वाघाडी नदीचा झाला कायापालट

घाटंजी दि. १३ (वार्ता.) भारतीय संस्कृतीतील धर्मामध्ये तीर्थ नावाची संकल्पना असून ती नैसर्गिक जलस्रोतांशी आणि पर्यायाने त्यांच्या पवित्र्याशी जोडलेली आहे. मानवी जीवन हे संस्कृती म्हणून सुरु होण्यापूर्वी पासूनच पाण्याचे पर्यायाने जलस्रोतांचे महत्त्व अधोरेखीत झालेले होते. म्हणून पाण्याला जीवन संबोधित केले जाते. हाच धागा पकडून घाटंजी शहरातील जलस्रोताचे सौंदर्यीकरण व शुद्धीकरण करण्याच्या दृष्टिकोनातून न.प.घाटंजी ने शहरातून वाहणारी वाघाडी नदीचे पात्र घाटीवरील मोठ्यापुला पासून ते पारवा




नाक्यावरील छोट्या पुला पर्यंत ७०० मीटर नदीचे खोलीकरण, रुंदीकरण करुन नदीला सुंदर बनविले आहे. गावातील नदी स्वच्छ व सुंदर दिसत असल्यामुळे नागरिकांनी आनंद व्यक्त केलेला आहे. याप्रसंगी नदीला सुंदर बनविणे या कामाला मूर्त रुप देणारे न.प.चे पाणी पुरवठा व स्वच्छता अभियंता राजू घोडके व स्वच्छता विभागातील कर्मचारी यांचा सत्कार नगराध्यक्ष सौ. नयनाताई ठाकूर व उपाध्यक्ष शैलेश ठाकूर यांचे हस्ते करण्यात आला. तसेच नदीपात्रामध्ये शहरातील घाण पाणी वाहून नेणाऱ्या ४ नाल्यावर पाणी शुद्धीकरण टँकची उभारणी करून शुद्ध पाणी नदीत सोडण्यात येणार असल्याबाबत अमोल माळकर मुख्याधिकारी न.प.घाटंजी यांनी सांगितले व तसेच यापुढे नदी पात्रात कोणीही अस्वच्छता करु नये असे नागरिकांना आवाहन सुद्धा करण्यात आले.

## अत्याधुनिक मशीन द्वारे अचूक रोगनिदान होणार

यवतमाळ दि. १३ (का.प्र.) नागपुरातील सुप्रसिध्द डॉ. आदित्य कान्हेरे पॅथॉलॉजिकल लॅब मध्ये हेमॅक्स डी.एक्स गॅझेल एच.बी. व्हेरीएंट द्वारे अचुक रोगनिदान शक्य होणार आहे.



अमेरिकेची मल्टीनॅशनल हेमॅक्स हेल्थ ही १००% भारतीय सहाय्यक कंपनी आहे. या उपकरणाद्वारे सिकलसेल रोगाचे निदान व नवजात बाळाच्या स्क्रिनींग साठी उपयोग होईल. वजनाने अत्यंत हलके, हाताळावयास सुटसुटीत व आकाराने हे उपकरण छोटे असल्याने पोर्टेबल असून त्यात इनबिल्ट असलेल्या बॅटरीवर ते चालते त्यामुळे दुर्गम भागातही रोग निदानाकरीता न्यावयास उपयुक्त आहे. महाराष्ट्राकरीता उपकरणाचे वितरक मे. तुळजाई लॅबपॉईन्ट प्रा.लि.हे आहेत. विदर्भात सिकलसेल रुग्णांचे प्रमाण अधिक असल्याने विदर्भातील जनतेसाठी या उपकरणाची उपयुक्तता अधिक आहे. अशी माहिती प्रफुल बिडकर यांनी दिली आहे.

# पहिल्याच पावसात उडाली दाणादाण शहाराच्या प्रमुख भागाला गटाराचे स्वरुप

## छत्रपती चौकातील पाणी इतरत्र काढण्याचे अभियंत्यांना आव्हान

उमरखेड दि. १३ (वार्ता.) गुरुवारी दुपारी ३ वाजताचे दरम्यान सुरु झालेल्या जोरदार पावसामुळे शहरातील नाल्यांचे घाण पाणी रस्त्यावर आले. या पाण्यामुळे शहरातील मुख्य चौक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकाला अक्षरशः तलावाचे स्वरुप निर्माण झाले होते. त्यामुळे विकास कार्याबाबत नगर परिषदेच्या स्वच्छ शहर सुंदर शहर, नुसते नांवाला पुरते उरलेले दिसुन येत आहे.



निसर्गराजाने मृग नक्षत्राची सुरुवात दमदार पावसाने सुरु केल्याने बळीराजाचा उत्साह वाढला आहे. शहर व ग्रामिण भागातील शेतकऱ्यांची खरीपाच्या पेरणीसाठी लगबग सुरु आहे. मात्र या पावसाने शहरातील नाल्यांचे घाण पाणी रस्त्यावर उतरुन शहरातील प्रमुख वर्दळीचे ठिकाण असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकाला तलावाचे स्वरुप आले होते. शहरात विकास कामे तेवढ्या च जलद गतीने सुरु केले असतांना व कार्यक्षम अभियंते व बांधकाम विभाग नगर परिषदेला तत्पर असतांना मात्र या मुख्य चौकातील खड्डे व रस्ता दुरुस्तीकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नसल्यामुळे दरवर्षी पावसाळयात नाल्यांचे घाण पाणी या चौकात साचून तलाव सदृष परिस्थिती निर्माण होते.

पादचाऱ्यांना घाण पाण्यातून यावे - जावे लागते. त्यामुळे नागरिक त्रस्त असतांना देखील नगर परिषदेचे कार्यालया समोरीलच मुख्य चौकाकडे दुर्लक्ष होते. याचे कोडे न सुटणारे आहे. पहिल्याच पावसाने नगर परिषदेच्या कारभाराची लक्तरे खुंटीला टांगली असल्याचा आरोप शहरवासी करित आहेत. पाणी मुख्य रस्त्यात साचत असल्याने ये-जा करनाऱ्या वाहनाने उडत असलेले पाणी नागरीकांच्या अंगावर येत असल्याने जीव मुठीत घेऊन रस्त्यावर पादचारी नागरिकांना चालन्याची वेळ आली असल्याने नियोजन क्षमतेवर कमालीचे प्रश्न निर्माण होऊ लागले आहे.

# अखिल महाराष्ट्र प्राथ. शिक्षक संघातर्फे कोविड लसीकरण जनजागृती उपक्रम

यवतमाळ दि. १३ (का.प्र.) चापडोह ता.जि. यवतमाळ येथे दि. ११ जून २०२१ रोजी कोविड लसीकरणाचे जि. प. यवतमाळ आरोग्य विभागाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. कोविड लसीकरणाची मोहीम यशस्वीरित्या पार पडावी या उद्देशाने व अधिकाअधिक नागरीकांनी लसीकरण करुन घेवून स्वतःचे व कुटूंबाचे साथरोगापासून संरक्षण करावे यासाठी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ जिल्हा शाखा यवतमाळच्या वतीने जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. यात संघाचे पदाधिकारी मंडळींनी घरोघरी जावून लसीकरणाचे महत्व समजावून सांगीतले तसेच लसीकरणाबाबत लोकांच्या मनात असणारे गैरसमजही दूर केले.

आम्ही लस घेतली तुम्ही पण घ्या असे लोकांना आवाहन केले. या उपक्रमात अ.मा.प्राथ. शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रदिपराव खंडाळकर , सचिव सारंग भटूरकर , संजय वाघमारे, गणेश फुपरे, गजानन हागोने यांनी सहभाग घेतला. या उपक्रमास चापडोह येथील सरपंच सौ. गिरीजा मानकर, पोलिस पाटील, रमेश फुपरे अशा कार्यकर्त्यां सौ. रोशना पाटील यांनी सहकार्य केले.

# राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील कामारकर यांचे जल्लोषात स्वागत

## जिल्हाध्यक्ष झाल्यानंतर पहिल्यांदाच दिली उमरखेड ला भेट

उमरखेड दि. १३ (वार्ता.) राष्ट्रवादी चे नवनियुक्त यवतमाळ जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील कामारकर हे उमरखेड नगरीत येथे प्रथमच आले असता त्यांचे उमरखेड राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्या बद्दल शुभेच्छा दिल्या.



बाळासाहेब हे राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष झाल्यानंतर प्रथमच उमरखेड शहरात आले होते. यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांशी विविध विषयावर चर्चा केली. येणाऱ्या काळात पक्ष संघटन मजबूत करुन राष्ट्रवादी पक्ष मजबूत करण्यावर लक्ष देण्यात येईल असे सांगितले. यावेळी कार्यकर्त्यांच्या समस्या देखील जिल्हाध्यक्षांनी जाणून घेतल्या. बाळासाहेब पाटील कामारकर यांच्या नेतृत्वात पक्षात बळकटी येईल व येणाऱ्या काळात तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस ला यश येईल असा विश्वास यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जाकीर राज, भिमराव पाटील चंद्रवंशी, संतोष सूर्यवंशी, अशू भाई, अविनाश वानखेडे, सुरज देशमुख, अविनाश यादवकुळे, निखिल निरंतर, युवराज बंडगर, पवन धुमाळे, सूर्यकांत पंडित, पवन धुमाळे, मुनाफ शेख, अंकुश राठोड व अन्य राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ
(खनिकर्म शाखा)

**यवतमाळ जिल्ह्यातील वाळू गटांचे पर्यावरण अनुमतीसाठी मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार नेमणुकीकरीता**

**ई-निविदा सूचना**

जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांच्याकडुन सर्व मान्यताप्राप्त पर्यावरण सल्लागार (**अललीशवळींशव एर्पींळीप-ाशपीं उेपीींश्रींरपीं**) यांना कळविण्यात येते की, यवतमाळ जिल्ह्यातील सन २०२१-२२ आणि २०२२-२३ या दोन वर्षाकरीता वाळूगटांच्या पर्यावरण अनुमती संबंधी १) **त्रीा १/१च,** २) **र्आीिंशव चळपळपस झश्ररप,** ३) **एखअ,** ४) **एचझ,** ५) **ड्डीलश्रळल क्शरीळपस** आणि ६) पर्यावरण अनुमती (**उएखअअ**) कडून प्राप्त करुन देणे याकरीता ई-निविदा अटी व शर्तीच्या अधिन राहून मागविण्यात येत आहे. याबाबतच्या अटी व शर्ती व इतर तपशील **ुीींरश्र.पळल.ळप** वर उपलब्ध असून निविदेची कार्यवाही **हीींि://ारहरींशपवशी.सेीं.ळप** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

| | | |
|---|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी दिनांक | १४.०६.२०२१ | सकाळी ११.०० वाजता |
| ई-निविदा पूर्व बैठक | १५.०६.२०२१ | दुपारी ४.०० वाजता (महसूल भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ) |
| ई-निविदा स्विकारण्याचा अंतिम दिनांक | २१.०६.२०२१ | दुपारी ४.०० वाजेपर्यंत |
| ई-निविदा उघडण्याचा दिनांक | २२.०६.२०२१ | दुपारी ४.०० वाजता |

(अमोल येडगे)
जिल्हाधिकारी,
यवतमाळ

वि.मा.का./अम./जाहि./२०३/२०२१-२०२२

**फ्लॅट विकणे आहे**

मातृशक्ती अपार्टमेंट सिव्हील लाईन्स येथील ३ बीएचके, भरपुर पाणी, हवेशीर फ्लॅट विकणे आहे.

-: संपर्क :- 9-9

मो.नं. ९४२२१६८७२२, ९५०३६७५९९९

**तयार फ्लॅट विकणे आहे**

१) २ बी.एच.के. ९२५ स्के.फुट - किं. २०,५०,००० रु.
२) २ बी.एच.के. ८३५ स्के.फुट - किं. १९,००,००० रु.
३) १ बी.एच.के. ५२५ स्के.फुट - किं. १३,५०,००० रु.
सर्व सोयीं युक्ती यवतमाळ मधील मध्यवस्तीत रेडी पझेशन मध्ये असेलेले व भरपूर पाणी व लिफ्टची व्यवस्था असलेले असे फ्लॅट त्वरित विकणे आहे. 7-21

**संपर्क :- ९८२२५७१२९९, ८८८८७२०६७२**

**पाहीजेत**

टॅली अकाउंटिंग व टेबल वर्क करीता कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे.
12-14 वेतन योग्यतेनुसार
-: संपर्क :-
मो.नं. ९८३४१४०७८१, ७७७६८६९८४७ 8-11

**बेचना / किरायेसे देना है**

दत्त चौक, दवा बाजार में १० २० स्क्वे.फुट (डॉक्टर के लिये उपयुक्त) दुकान और अवधुतवाडी मे ३ मंजील मकान बेचना या भाडे से देना है। 8-14

**संपर्क :- मो. ८३२९६६८५४७**



JOCKEY women's
- Bra
- Panty
- Slip
- Capri
- Long Pant
- T Shirts

JOCKEY MEN'S
- Banian
- Underwear
- Socks
- Sports shorts
- Sports Brief
- Sports Banian
- Sports t-shirts
- Boxer Shorts
- Bermuda
- Pyjama
- Jersey Pants
- Track Pants



Since 1968
राज ड्रेसेस
देवजी गणपत किराणा के बाजू मे, मेन रोड, यवतमाल
Ph.No. 247238

## अंक व बातम्या करीता संपर्क साधावा

| | |
|---|---|
| अफजल खान - दिग्रस, | प्रकाश मेहता - राळेगाव, |
| रामकृष्ण वैद्य - वणी, | घाटंजी - पोटपिल्लेवार, |
| अजहर उल्ला खान - उमरखेड, | कळंब - रुस्तम शेख |
| निलेश वंजारी - नेर, | आर्णी - |
| उमेश गाडे - महागाव, | किशोर पवार |
| वणी - श्रीकांत किटकुले | अशफाख खान - पांढरवकडा |

